जानेवारी-२०२५ * अंक-७ वा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2024-25





आर.आय.प्रेसिडेंट
**रो. स्टेफनी अर्चिक**



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
**रो. राजिंदरसिंग खुराना**



प्रेसिडेंट
**रो. ॲड. सागर चित्रे**



ऑन.सेक्रेटरी
**रो. पराग अग्रवाल**



बुले.कमिटी चेअरमन
**रो. स्वाती ढाके**

THE MAGIC OF ROTARY

ROTARY CLUB OF OJAI 75th Anniversary 1948 - 2023




BACHPAN
CLUB THEME 2024-25

## संपादकीय....✍

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

सर्वप्रथम सर्वाना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

जानेवारी महीना व्यावसायिक सेवा म्हणून डेजिग्नेटिड मंथ आहे. व्यावसायिक सेवा ही अशी पद्धत आहे. जिथे रोटरीच्या सर्व व्यवसायांना आदर्श, प्रोत्साहन आणि समर्थन जाते. व्यवसाय कौशल्याचे योगदान, समाजवादी सेवा करण्याची संधी प्रत्येक रोटेरियन्स्‌ला मिळते. त्याच्या व्यवसायास सन्मानित करते. या अनुषंगाने पान नंबर ४ वर सविस्तर माहिती पूर्ण लेख दिलेला आहे. पी.पी.रो.जगदीश जाखेटे सर आज आपल्यात नाहीं पी.पी.रो. मानुधने मॅडम यानी आपल्या सर्वां तर्फे त्यांना दिलेली श्रद्धांजलि पर लेख पान नंबर ५ वर आहे. मागील महीन्यात २० तारखेला प्रांतपाल रो. राजिंदर सिंग खुराना यानी आपल्या क्लबला ऑफिशियल भेट दिली. अमृत महोत्सवी वर्ष साजरा करणाऱ्या आपल्या क्लबच्या या रोटरी वर्षाच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यानी आपल्या सर्वांचे खूप कौतुक केले. तसेच कोणतीही केलेली मदत ही छोटी किंवा मोठी नसते तर गरजू व्यक्तीसाठी ही लाखमोलाची असते, असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. तसेच ८ डिसेंबर रोजी झालेल्या बॉक्स क्रिकेट सिझन-४ मध्ये सर्व रोटेरियन्सने सहभाग नोंदविला. याचे छायाचित्रे पान नं. ७ वर आहेत. जानेवारी महीन्यात होणाऱ्या डी.कॉन्फरन्स साठी सर्वाना आमंत्रित केले. जास्तीत जास्त समाजातील गरजू व्यक्ती पर्यत रोटरी कार्य ने पोहोचण्याचा नवीन वर्षाचा संकल्प करुन नवीन वर्षाची सुरुवात करु या.

**- रो. स्वाती ढाके**

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम,

मित्रांनो, डिसेंबर महिना आपल्या क्लब व सदस्यांसाठी खरच खूपच महत्त्वाचा होता. प्रोजेक्टस् सोबत ह्या महिन्यात आपले लाडके प्रांतपाल श्री. रो. राजिंदर सिंग खुराणा व डिस्ट्रीक्टच्या पहिल्या महिला सौ. गिन्नी मॅडम यांनी क्लबला ऑफिशियल भेट दिली. दोघांचे ही मन:पूर्वक धन्यवाद ! प्रांतपाल खुराणा सरांनी त्यांच्या भाषणात आपल्याला मार्गदर्शन केले. तसेच आपल्या क्लब तर्फे घेण्यात आलेल्या वेगवेगळ्या प्रकल्पांबाबत समाधान व्यक्त केले व आपला क्लब हा एक आदर्श क्लब म्हणून ओळखला जातो असे म्हणून गौरव ही केला. त्या दिवशी आपल्या सदस्यांनी थॅलेसेमिया ग्रस्त बालकांना दत्तक घेतले. ह्या महिन्यात आपल्या क्लब तर्फे नेहमी प्रमाणे प्रोजेक्ट घेतलेले असून उल्लेखनीय बाब म्हणजे ह्या महिन्यात आपल्या क्लब तर्फे ज्ञानयोगी श्री.विवेक घळसासी यांचे अध्यात्म सर्वांसाठी या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजनही करण्यात आले होते. इंटरॅक्ट कमिटी मार्फत इंटरॅक्ट क्लबच्या मुलांसाठी सायन्स प्रदर्शन या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आलेले होते व त्यात मुलांनी मोठ्या संख्यामध्ये सहभाग नोंदविला होता.

पुढील महिना हा 'व्होकेशनल सर्व्हीस मंथ' म्हणून आहे. तसेच येणारे वर्षाची सुरुवात ही नागपूर येथील डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स ने होणार असून, आपल्या क्लब तर्फे ७५ पेक्षा जास्त सदस्यांनी नोंदणी केलेली असून ही आपल्या क्लब साठी उत्साह वाढविणारी गोष्ट आहे.

शेवटी, सगळ्यांना नवीन वर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा !

**- रो. ॲड. सागर चित्रे**

# डिसेंबर महिन्यातील साप्ताहिक सभा

**✻ ६ डिसेंबर –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही 'क्लब असेब्ली' होती. यावेळी विविध कमिटी चेअरमन्स् यांनी आतापर्यंतच्या आपल्या कार्याचा आढावा घेतला. तसेच आगामी उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली.







**✻१३ डिसेंबर–** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही 'इलेक्शन मिटींग' होती. यात पुढील रोटरी वर्ष २०२५-२६ साठी सर्वानुमते रो.गिरीश कुलकर्णी यांना अध्यक्ष तर रो.सुभाष अमळनेरकर यांना मा.सचिव म्हणून निवडण्यात आले. तसेच याप्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी आपले विश्वस्त मंडळ जाहीर केले.

**✻ २० डिसेंबर** – रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही प्रांतपाल रो.राजिंदर खुराणा यांची क्लबला ऑफिशिअल भेट होती. याप्रसंगी त्यांनी क्लब उपक्रमाचे कौतुक करत सर्व रोटेरियन्स्ला मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी सहप्रांतपाल रो.जितेंद्र ढाके उपस्थित होते.






**✻ २७ डिसेंबर–** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही 'फॅमिली मिटींग' होती. विषय होता 'निरोगी आयुष्याचा रहस्य' वक्ते होते. पी.पी.रो. डॉ.जयंत जहागीरदार.

**✻ २१ डिसेंबर–** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे पब्लीक स्पीच गंधे सभागृह येथे आयोजित करण्यात आले होते. विषय होता 'अध्यात्म आपणा सर्वांसाठी'. या कार्यक्रमाचे वक्ते होते ज्ञानयोगी विवेक घळसासी, या प्रकल्पाचे प्रमुख रो.डॉ.प्रदीप जोशी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो.गिरीश कुलकर्णी यांनी केले.



# डिसेंबर महिन्यातील प्रोजेक्टस्




*** ३ डिसेंबर –** रोजी श्रीराम माध्यमिक विद्यालय व बालनिकेतन विद्यालय येथे रोटरी क्लब तर्फे आयडल एज्युकेशन ॲप इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी रोटरी क्लब चे अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे, मानद सचिव रो.श्री.पराग अग्रवाल, सहप्रांतपाल रो.जितेंद्र ढाके, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.मोहन कुलकर्णी, श्रीराम विद्यालय चे मुख्याध्यापक दिवाकर जोशी सर हे प्रमुख अतिथी होते.



*** १० डिसेंबर –** रोजी डोमगाव येथील आश्रम शाळेला रोटरी क्लब जळगाव तर्फे संगणक भेट देण्यात आला. या निवासी शाळेत ४०० हून अधिक आदिवासी मुले मुली आहेत. त्यांना संगणकाचा उपयोग होणार आहे. या प्रकल्पाचे प्रमुख रो.निलेश झोपे आहेत. यासाठी रो.राघवेंद्र काबरा आणि रो.मनोज जोशी यांचे सहकार्य मिळाले . त्यावेळी रोटरी क्लब चे अध्यक्ष रो सागर चित्रे, सचिव रो.पराग अगरवाल, ई लर्निंग समिती प्रमुख, रो.शुभदा कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख रो.निलेश झोपे आणि इतर रोटरीचे पदाधिकारी उपस्थित होते.



*** १४ डिसेंबर –** रोजी रोटरी क्लब जळगावच्या इंट्रॅक्ट क्लब मधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या सायन्स मॉडेल स्पर्धेत २९ प्रोजेक्ट्स मध्ये ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विजेत्या विद्यार्थ्यांना रोटरी क्लबतर्फे पारितोषिके आणि सहप्रांतपाल जितेंद्र ढाके यांच्याकडून देखील विशेष बक्षिसे देण्यात आली. बक्षीस वितरणास रोटरी क्लबचे अध्यक्ष ॲड.सागर चित्रे, सहप्रांतपाल जितेंद्र ढाके, मानद सचिव पराग अग्रवाल, कमिटी चेअरमन डॉ. काजल फिरके, को–चेअरमन विश्वजीत बराटे, प्रा. डॉ.शुभदा कुलकर्णी, पंकज जयस्वाल, डॉ.पवन बजाज यांची प्रमुख उपस्थिती होती.




*** २० डिसेंबर–** रोजी प्रांतपाल यांची क्लबला ऑफिशिअल भेट होती. त्यावेळी इंडियन रेडक्रॉसच्या संयुक्त विद्यमानाने १९ थॅलेसेमिया पेशंट रोटरी क्लब जळगावच्या सदस्याकडून वर्षभरासाठी दत्तक घेण्यात आले. एकूण १,९८,०००/– रूपये चेक प्रांतपाल राजिंदर खुराणा यांच्या हस्ते इंडियन रेडक्रॉसला देण्यात आला.




*** २९ डिसेंबर –** रोजी जळगाव माल धक्का येथे १६५ कामगारांची तपासणी करण्यात आली. यावेळी नेत्र तपासणी, हाडांची तपासणी, सर्दी, खोकला, ताप यावर गोळ्या देण्यात आल्या. ५३ कामगारांना चष्मा वाटप करण्यात आले. मोतीबिंदू ऑपरेशन पुढील आठवड्यात ठेवण्यात आले आहे. यावेळी रोटरीचे सन्माननीय डॉक्टर व पदाधिकारी उपस्थित होते.

# व्यावसायिक सेवा

व्यावसायिक सेवा ही क्लबची आणि सदस्यांची जबाबदारी आहे. क्लबची भूमिका म्हणजे वारंवार प्रात्यक्षिक करून, स्वतःच्या कृतींचा वापर करून, उदाहरणाद्वारे आणि सदस्यांना त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांमध्ये योगदान देणाऱ्या प्रकल्पांच्या विकासाद्वारे उद्दिष्टेची अंमलबजावणी आणि प्रोत्साहन देणे. आणि त्यांचे व्यवसाय रोटरीच्या तत्त्वांनुसार आणि क्लबने विकसित केलेल्या प्रकल्पांना प्रतिसाद देण्यासाठी.

२०१४ मध्ये आर.आय. बोर्डाने रोटेरियन्ससाठी चार कलमी आचारसंहितेची शिफारस केली जी १९८९ पासून प्रचलित होती .जी व्यवसाय आणि व्यवसायातील रोटेरियन्सच्या घोषणेच्या जागी होती.

२०२३ मध्ये रोटेरियन आचारसंहितेमध्ये आणखी बदल झाले. आर.आय. बोर्डाच्या सांगण्यावरून, सरचिटणीसांनी रोटेरियन आचारसंहिता, जिल्हा गव्हर्नर आचारसंहिता आणि संचालक आचारसंहिता यांना एका नवीन 'सदस्य आचारसंहिता' मध्ये एकत्रित केले.' एप्रिल २०२३ मध्ये झालेल्या आर.आय. बोर्डाच्या सभेने त्यास मान्यता दिली आणि आर.सी.पी. मध्ये रोटेरियन आचारसंहिता म्हणून दिसून आली. हे सर्व रोटेरियन आणि रोटरॅक्टर्ससाठी आहे.

४–वे चाचणी या संहितेच्या केंद्रस्थानी आहे. आदर्श हे केवळ वाक्प्रचार आहेत जर ते जगले नाहीत तर त्यांनी त्यांची अभिव्यक्ती रोटेरियन्समध्ये शोधली पाहिजे, असे भूतकाळातील आरआयचे अध्यक्ष ॲलन डी. अल्बर्ट यांनी १९१३ मध्ये सांगितले होते. बाहेरचे जग रोटरीयन्सद्वारे रोटरी पाहते आणि मोजते. वैयक्तिक रोटेरियन व्यावसायिक सेवेत अयशस्वी झाल्यास, रोटरी अयशस्वी होईल. वास्तविक रोटेरियन नैतिकतेच्या प्रश्नावर बिनधास्त आहेत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नैतिक पद्धतींच्या गरजेबद्दल जनजागृती करण्यासाठी क्लब योग्य चर्चा गट आणि मंच आयोजित करू शकतो.

जरी व्यावसायिक सेवेची तत्त्वे वैयक्तिक रोटेरियनद्वारे २४ ु ७, ३६५ दिवसांचे पालन करणे आवश्यक असले तरी, जानेवारी महिना या क्षेत्रातील क्लब क्रियाकलापांसाठी निश्चित केला आहे. महिन्याभरात क्लब वर्गीकरण चर्चा, सभासदांच्या कामाच्या ठिकाणी दौरे आयोजित करू शकतो. रोटरी युथ लीडरशिप अवॉर्ड आर.वाय.एल.ए. नेतृत्व विकास कार्यशाळा, युवा मार्गदर्शन कार्यक्रम, कर्मचारी–नियोक्ता सेमिनार, व्यावसायिक मैत्री देवाणघेवाण, करियर–फेअर्स, करिअर संधी मेळावे, विविध क्षेत्रातील व्यावसायिक उत्कृष्ता ओळखण्यासाठी व्यावसायिक पुरस्कार, स्थानिक अधिकाऱ्यांशी बैठका. समुदायाच्या व्यावसायिक गरजा शोधणे आणि त्या संबोधित करणे आणि/किंवा कोणताही कार्यक्रम किंवा क्रियाकलाप जो परिसर करू शकतो आवश्यक व्यावसायिक सेवा उपक्रमांना चालना देण्यासाठी रोटरी फेलोशिप्स आणि रोटरी ॲक्शन ग्रुप्स जोडले जाऊ शकतात.

व्यावसायिक सेवा – 'मी रोटरीची परतफेड कधीच करू शकत नाही. आणि माझ्या शेवटच्या प्रवासात माझे हात रिकामे राहणार नाहीत– रोटरीने मला जे दिले त्यातून ते भरले जातील, व्यावसायिक सेवेचे आभार.'

पीआरआयपी राजा साबू आंतरराष्ट्रीय असेंब्ली–२००९ मध्ये 'प्रामाणिकपणा अजूनही सर्वोत्तम धोरण आहे हे सत्य आपण सतत घरोघरी हातोडा मारूया; आपण दररोजच्या व्यवहारात योग्य नैतिकता पुनर्संचयित करण्यासाठी कार्य करूया.'

पीआरआयपी (१९५०–५१) आर्थर लग्यूक्स, द रोटेरियन, जुलै १९५०

# इतिहासातील सुवर्ण पान

माजी रो.पी.पी. डॉ.किसन काबरा




रो. पी.पी. डॉ. किसन काबरा सर्वजण प्रेमाने त्यांना काकाजी म्हणायचे. रोटरीमूल्य आत्मसात केलेले, रोटीचे मूल्य जगलेले एक खरे रोटेरीयन. त्यांचा अध्यक्षीय कार्यकाळ होता. रोटरी वर्ष १९९४-९५. ते १९८६ साली रोटरी क्लब जळगाव चे सदस्य झाले. त्यांनी केलेल्या रोटरी कार्यामुळे ते आपणा सर्वांसाठी एक आदर्श व्यक्तीमत्त्व होते. ते रोटरी फाऊंडेशन चे मेजर डोनर होते.

रोटरीची चेतना जिवंत ठेवण्याबाबत ते आपल्यासाठी प्रेरणास्थान आहे. आपण सर्वंना त्यांचा अभिमान आहे. रोटरी परिवारासाठीचे ते प्रेरणा स्त्रोत आहे. न्यू मेंबर्ससाठी त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. काकाजीने सर्वांना दिलेल्या शब्द 'रोटरी प्रणाम' याबद्दल आपण नेहमीच त्यांचे ऋणी राहू.

रो.गिरीश कुलकर्णी यांनी त्यांच्या लेखनात काकाजींना वृत्ती शून्य योगेश्वर संबोधले आहे. काकाजी कुठल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता जीवनाचा आनंद घ्यायचे व तो आनंद वाटायचे काम अव्याहतपणे करायचे. त्यांनी केलेली प्रत्येक कृती ही सात्विकतेनेच ओतपोत भरलेली असायची. आपल्या कृतीचा सार्वजनिक गवगवा व्हावा असे त्यांना कधीच अपेक्षित नव्हते पण त्यांच्या 'रोटरी प्रणाम' या देणगी मुळे ते चिरकाल सर्वांच्या स्मरणात राहतील. त्यांच्या खूप साऱ्या आठवणी क्लब मधील प्रत्येक रोटरीयन जवळ असतील. कारण ते प्रत्येक सदस्यांची आपलेपणाने चौकशी करून युक्तीच्या चार गोष्टी सहज सांगत.










# भावपूर्ण श्रद्धांजली- रो.पी.पी.जगदीश जाखेटे

रो.पी.पी. पुनम मानुधने





स्व. श्री. जगदीशजी जाखेटे आपल्या रोटरी परिवारास ८ ऑगस्ट १९७७ साली सामील झालेत. अत्यंत मृदभाषी, मीतभाषी व शांत स्वभाव हा त्यांचा अत्यंत वाखाणण्यासारखा गुण होता. त्यांना रागवतांना किंवा कोणाशी जोरात बोलतांना कधीच पाहिले नाही. ते सर्वांशीच मिळून मिसळून वागत असत. क्लब मध्ये जॉईन झाल्यावर त्यांनी अनेक कमिट्यांची धुरा सांभाळली आहे. कुठलाही प्रोजेक्ट असो, त्यांचा नेहमीच सक्रीय सहभाग असायचा. त्यांच्या या गुणांमुळेच १९८८-८९ साली आपल्या क्लबचे पहिले डी.जी. डॉ. चंद्रशेखर सिकची हे प्रेसिडेंट असतांना त्यांची ऑनररी सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी त्यांचे काम अत्यंत चोखपणे केले व सन १९९०-९१ साली आपल्या क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. सर्व सिनिअर आणि ज्युनिअर रोटेरीयन्स्ना सोबत घेऊन, त्यांनी त्यांच्या रोटरी वर्षात अनेक समाजपयोगी प्रोजेक्टस् केलेत. इथे एक गोष्ट प्रकर्षाने नमूद करावीशी वाटते. प्रत्येक मिटींगला येतांना ते पूर्ण होम वर्क करून येत असत आणि म्हणूनच मिटींग अगदी व्यवस्थित पार पडत असे. अगदी शेवट पर्यंत त्यांना रोटरी बद्दल खूपच आपुलकी होती. त्यांचे असे अचानक निघून जाणे खरंतर मनाला चटका देऊन गेले. आज ते आपल्यात नाहीत. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती प्रदान करो, हीच प्रार्थना.

---

# बोर्ड ऑफ डायरेक्टर २०२५-२६

अध्यक्ष – रो. गिरीश कुलकर्णी
उपाध्यक्ष– रो. ॲड. हेमंत भंगाळे
मानद सचिव–रो. सुभाष अमळनेरकर,
सहसचिव– रो. स्वाती ढाके
सचिव (कम्युनिकेशन)– रो.पंकज व्यवहारे
खजिनदार– रो. उदय पोतदार

## संचालक मंडळ

पीपी रो.छबीलभाई शहा (कायम आमंत्रित)

| | | |
|---|---|---|
| पीपी.रो. प्रेम कोगटा | रो. सागर चित्रे | पीपी रो.डॉ.प्रदीप जोशी |
| पीपी रो.राघवेंद्र काबरा | पीपी रो. जयंत जहागीरदार | पीपी रो. तुषार फिरके |
| पीपी रो. जितेंद्र ढाके | पीपी रो. संदीप शर्मा | पीपी रो. राजेश वेद |
| पीपीरो. मनोज जोशी | रो. योगेश गांधी | रो. डॉ. शुभदा कुलकर्णी |
| रो. काजल फिरके | रो. पराग अग्रवाल | रो. राजेश यावलकर |
| रो. चंदन महाजन | रो. रितेश जैन | रो. राकेश चव्हाण |
| रो. विजय जोशी (आमंत्रित) | | |

# ओसीव्ही चे काही छायाचित्रे




















# बॉक्स क्रिकेट धमाल सिझन-४





## जीवेत् शरदः शतम्...!

1) ३ जानेवारी रो. डॉ. प्रज्ञा जंगले
2) ९ जानेवारी रो. अशोक आहुजा
3) १८ जानेवारी रो. शशिकांत कुलकर्णी
4) १९ जानेवारी पीपी कॅ.रो.मोहन कुलकर्णी
5) २० जानेवारी रो. उदय पोतदार
6) २४ जानेवारी रो. नितीन काळुंखे
7) २५ जानेवारी रो. काजल फिरके
8) २७ जानेवारी रो. मनोज जोशी
9) ३१ जानेवारी रो. विलास कुलकर्णी

## नांदा सौख्यभरे...

1) १२ जानेवारी रो. ॲड. सागर चित्रे
2) १९ जानेवारी पीडीजी डॉ.रो. सी. सिकची
3) २३ जानेवारी रो. राजेश यावलकर
4) २५ जानेवारी रो. राजू आडवाणी
5) २६ जानेवारी रो. रणवीरसिंग कलसी
6) २८ जानेवारी रो.दीपिका & दीपक चांदोरकर

## जानेवारी महिन्यातील कॅप्टन

सदर कॅप्टन यांनी जानेवारी महिन्यात क्लबच्या सर्व कमिटी चेअरमन यांचेशी समन्वय साधून त्यांच्या कामात मदत करणे.



पीपी. रो.मनोज जोशी



रो.प्रदीप खिवसरा

**अभिनंदन!**

✻ रोटरी क्लब अमळनेर आयोजित प्री–पीईएलएस–एसईएलएस वर्ष २०२५–२६ मध्ये पीपी रो. प्रेम कोगटा यांनी रोल ॲन्ड रिस्पॉन्सीबिलीटी या विषयावर मार्गदर्शन केले, नि.अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी कार्यक्रमाबद्दल मनोगत व्यक्त केले.

✻ रोटरी क्लब जळगाव ईस्ट आयोजित प्री–एजीएलएस या वर्ष २५–२६ च्या असिस्टंट गव्हर्नर इलेक्टसाठी आयोजित सेमिनारमध्ये आपल्या क्लबचे डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी (ओसीव्ही) इलेक्ट पी.पी. रो.डॉ. तुषार फिरके यांनी क्लब व्हिजीट ॲन्ड इव्हॅल्युेशन विषयावर तर प्रेसिडेंट इलेक्ट गिरीश कुळकर्णी यांनी रोटरी.ओआरजी विषयावर सत्र घेतले.

✻ सामाजिक कार्यातील उल्लेखनीय कामगिरी व छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यावरील राजा रयतेच्या महानाट्याची निर्मितीसाठी युवा आयडॉल २०२४ हा पुरस्कार शिवरत्न प्रतिष्ठनचे अध्यक्ष रो.श्री.जयवर्धन नेवे यांना देऊन गौरव करण्यात आला.

## ✻ श्रद्धांजली ✻

रो.पी.पी.जगदीश राधाकिसनजी जाखेटे यांचे दु:खद निधन झाले.
रो.कुणाल झवर यांची पत्नी नयना झंवर यांचे दु:खद निधन झाले.